RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ३, अंक ३७(२)] सोमवार, एप्रिल २४, २०१७/वैशाख ४, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ५०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल २०१७

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एलक्यूएन. १२/२०१३/प्र.क्र.१९०/अ-२.— ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) याच्या पहिल्या अनुसूचीच्या नोंद २ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र.एलक्यूएन.१२/२०१३/प्र. क्र. १९०/अ-२, दिनांक २६ मे २०१५ याद्वारे महाराष्ट्र शासनाने समुचित शासन म्हणून, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रांच्या बाबतीत ज्या घटकांद्वारे बाजारमूल्य गुणले जाणार आहे तो घटक अधिसूचित केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा.३७) अन्वये तयार केलेल्या प्रादेशिक आराखड्यात कृषि व ना विकास क्षेत्रांच्या बाबतीत ज्याद्वारे बाजारमूल्य गुणावयाचे आहे तो घटक २ अधिसूचित करणे महाराष्ट्र शासनास इष्ट वाटते.

म्हणून आता, उक्त अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीच्या नोंद २ याव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेमधील अनुसूचीत,—

(एक) स्तंभ (२) मधील, अनुक्रमांक २ समोरील नोंदीमध्ये " उपरोक्त खंड (क) ते (घ) मध्ये नमूद केलेली क्षेत्रे वगळता " या मजकुराऐवजी " नोंद १ व ३ मध्ये नमूद केलेली क्षेत्र वगळता " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) अनुक्रमांक ३ समोरील नोंदीमध्ये " जिल्ह्यांसाठीच्या प्रादेशिक आराखड्यांमधील " या मजकुराऐवजी " महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) याच्या तरतुदीनुसार तयार केलेल्या जिल्ह्यांसाठीच्या प्रादेशिक आराखड्यांमधील कृषि व ना विकास क्षेत्र, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. कि. गावडे,**
शासनाचे सहसचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated 24th April 2017

*NOTIFICATION*

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No.LQN.12/2013/C.R.190/A-2.—Whereas, the Government of Maharashtra being the appropriate Government, has, *vide* Government Notification, Revenue and Forests Department, No. LQN.12/2013/ C.R.-190/A-2, dated the 26th May 2015, issued in exercise of the powers conferred by entry 2 of the First Schedule of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) and of all other powers enabling it in that behalf, notified the factor by which the market value is to be multiplied in respect of the areas specified therein ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to notify the factor 2 by which the market value is to be multiplied in respect of agricultural and no development zone in Regional Plan prepared under the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966).

Now, therefore, in exercise of the powers conferred by entry 2 of the First Schedule of the said Act, the Government of Maharashtra hereby amends the said notification as follows :—

In the said Notification, in the Schedule,—

(*i*) in entry at serial No. 2, in column (2), for the words, letters and brackets "excluding the areas mentioned in clauses (*a*) to (*d*) above" the words and figures "excluding the areas mentioned in entries 1 and 3" shall be substituted;

(*ii*) in entry at serial No. 3, for the words " in Regional Plans for Districts" the words " agricultural and no development zone in Regional Plans for Districts prepared in accordance with the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. GAWADE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.